
चांगुलपणाचा झरा

एलिझाबेथ फ्राय यांची गोष्ट



स्पेन्सर जॉन्सन

अनुवाद: सुजाता गोडबोले



चांगुलपणाचा झरा

एलिझाबेथ फ्राय यांची गोष्ट



स्पेन्सर जॉन्सन

अनुवाद: सुजाता गोडबोले

लिओनार्ड के. फायरस्टोन

यांच्या चांगुलपणासाठी त्यांना समर्पित



एलिझाबेथ फ्राय या दयाळू बाईंची ही गोष्ट आहे. ती त्यांच्या आयुष्यातील खऱ्या खुऱ्या प्रसंगांवर आधारित आहे. पृष्ठ ६१ वर त्यांच्याविषयी अधिक ऐतिहासिक माहिती दिली आहे.

एकदा काय झालं ...

एलिझाबेथ नावाची एक मुलगी इंग्लंडमध्ये एका मोठ्या घरात रहात असे. ती मऊ गादीवर झोपायची आणि सुंदर सुंदर कपडे घालायची. तिचे जेवण छान चविष्ट आणि पौष्टिक असायचे आणि हवा चांगली असली तर ती तिच्या भावंडांसोबत बागेत खेळायची.

खरे तर तिने आनंदी असायला हवे, पण ती आनंदी नव्हती.

“मला लोकांना मदत करायला आवडते, कारण मग लोकांनाही आनंद मिळतो,” ती म्हणायची.

“ज्यांचा कोणी विचारही करत नाही अशा लोकांना मी जर मदत करु शकले, तर किती बरे होईल.”



कधी कधी एलिझाबेथ खूप दुःखी असायची. अशाच एका दिवशी एक फुलपाखरू उडत उडत तिच्या बागेत आले. ते फुलपाखरू तिच्याशी बोलते आहे अशी तिने कल्पना केली.

“बाळ, तू का बरं इतकी उदास आहेस?” फुलपाखरू म्हणाले, “मी तुला मदत करेन. आजपासून मी तुझी मैत्रीण होईन.”



बोलणारे फुलपाखरू काही खरे नसले, तरी बोलणाऱ्या फुलपाखराची कल्पना तर छान, मजेची होती.

“एलिझाबेथ, तू इतकी उदास का आहेस?” फुलपाखराने विचारले.



“मला लोकांना मदत करता येत नाही म्हणून मी दुःखी आहे,” एलिझाबेथ म्हणाली. “मला रहायला मोठे घर आहे, झोपायला मऊ गादी आहे, छान छान कपडे आहेत. सगळे माझ्याशी चांगले वागतात. पण मला माहित आहे की बऱ्याच लोकांची कोणीच काळजी घेत नाही, त्यांना कोणीच मदत करत नाही. म्हणून मला वाईट वाटतं.”

“तुला का वाईट वाटतं ते मला आता समजलं,” फुलपाखरू म्हणाले. “मी आताच न्यू गेट तुरुंगावरून उडत आले आणि तिथल्या कैदी स्त्रिया कशा राहतात हे पाहून मी फार अस्वस्थ झाले आहे.”

“हो का?” एलिझाबेथ म्हणाली.



फुलपाखरू मग एका फुलावर जाऊन बसले. “तुरुंगात राहणं म्हणजे काय हे मला चांगलंच माहित आहे.” एक उसासा टाकून फुलपाखरू म्हणाले. “सुरवंट असताना मी कोशातच राहत असे. तेव्हा मला हिंडता फिरता येत नसे की बाहेरही जाता येत नसे. तो एक प्रकारचा तुरुंगच होता.”


“किती भयंकर ना!” एलिझाबेथ म्हणाली. पण मग तिला एक कल्पना सुचली. ती म्हणाली, “मी असं करेन, की मी न्यू गेट तुरुंगातील महिला कैद्यांना भेटायला जाईन. कदाचित त्यांना मदत करता येईल.”





आणि ती पळत पळत आपल्या मोठ्या घरात गेली.

तुरुंगातील कैद्यांकडे सुंदर कपडे नसतात हे तिला माहित होते. “मी आधी कपडे बदलते. त्यांचे कपडे चांगले नाहीत याची त्यांना मुद्दाम आठवण करून द्यायला नको. नाहीतर त्यांना आणखी वाईट वाटेल.”



मग तिने एक साधा राखी रंगाचा फ्रॉक घातला आणि डोक्यावर एक साधी पांढरी टोपी घातली.

“मी पण तुझ्याबरोबर येईन,” फुलपाखरू म्हणाले , “पण मी मात्र कपडे बदलणार नाही हं.”

हे ऐकून एलिझाबेथला हसू आले. फुलपाखरू कपडे बदलत नाही हे सगळ्यांनाच माहित असते की!

एलिझाबेथने आपल्या वडिलांना सांगितले की ती न्यू गेट तुरुंगातील महिला कैद्यांना भेटायला निघाली होती.

“नको, एलिझाबेथ,” तिचे वडील म्हणाले. “न्यू गेट तुरुंगातील महिला गुन्हेगार आहेत. त्यांनी वाईट गोष्टी केल्या म्हणूनच त्यांना तुरुंगात ठेवले आहे. गुन्हेगारांना भेटायला जाण्यासाठी तू अजून फार लहान आहेस. ते धोक्याचे आहे. तुला त्याचा त्रास होईल.

“पण हे बघ. तू आता जरी लहान असलीस, तरी लवकरच मोठी होशील,” तिचे वडील म्हणाले. “तू आता इस्पितळातल्या आजारी लोकांची विचारपूस करायला का जात नाहीस? मोठी झाल्यावर हवे तर तू तुरुंगात जा.”



अगोदर तिला वाईट वाटले. पण मग विचार केल्यावर तिला ही कल्पना आवडली.


मग ती इस्पितळात गेली. सगळ्यांकडे पाहून ती गोड हसली आणि प्रत्येकाशी त्यांना बरे वाटेल असे बोलली. आजारी लोकांना एलिझाबेथला भेटून खूप बरे वाटले. ती मुद्दाम त्यांना भेटण्यासाठी आली होती हे पाहून ते खूष झाले.

एलिझाबेथ आता कामात गुंतली होती म्हणून तीही आनंदात होती. वेळ भराभर जात होता. ती मोठी झाली, तिचे लग्नही झाले. आता तिचे नवे आडनाव होते फ्राय.



एक दिवस एलिझाबेथने ठरवले की आता न्यू गेट तुरुंगात जायला काही हरकत नाही.

“पण काळजी घे हं,” फुलपाखराने तिला सूचना केली. “तिथल्या काही स्त्रिया तिथे जाण्याच्या आधीपासूनच वाईट होत्या. पण तुरुंगातील परिस्थिती तर इतकी वाईट आहे की आता तिथल्या बहुतेक जणी आणखीच वाईट झाल्या आहेत. कदाचित त्या तुलाही त्रास देतील.”



सुरुवातीला एलिझाबेथ फ्रायना भीती वाटत नव्हती, पण तुरुंगात गेल्यावर मात्र त्यांना अस्वस्थ वाटू लागले.


"हे भीतीदायक आहे!" त्यांच्या मनात विचार आला. "किती घाण आहे! हवा देखील इतकी खराब आहे की मला तर नीट श्वासही घेता येत नाही. कोणालाही असे राहवे लागणे भयंकर आहे."



तेथील परिस्थिती फारच वाईट होती. तुरुंगात राहणाऱ्या स्त्रिया खूप आळशी आणि अस्वच्छ होत्या. त्यांनी अनेक दिवसात केसही विचारले नव्हते आणि त्यांच्या कपड्यांच्या चिंध्या झाल्या होत्या. त्या जोरजोरात ओरडून एकमेकींशी भांडत होत्या.

का?

कारण त्यांना करायला दुसरे काहीच नव्हते. शिवाय त्या काय करतात याची कोणालाच पर्वा नव्हती. एकमेकांशी चांगले वागावे हे त्यांना कोणीच शिकवले नव्हते.



तिथल्या दोन बायका एकमेकींशी भांडू लागल्यावर एलिझाबेथ म्हणाल्या, “अरे बापरे!” जखमी प्राण्यांप्रमाणे त्या एकमेकींना ओरबाडू लागल्या. त्या एकमेकींना शिव्या देत होत्या, चावे घेत होत्या आणि लाथाही मारत होत्या.

“कृपा करून हे थांबवा!” एलिझाबेथ मोठ्याने म्हणाल्या.






हे ऐकून त्या भांडायच्या थांबल्या आणि एलिझाबेथ यांच्याकडे टक लावून पाहू लागल्या.

“आली मोठी शहाणी आमची चेष्टा करायला,” एक म्हणाली.

“आता आपण तिचे कपडेच फाडूया, “ दुसरी म्हणाली.

“गुद्दे मारून तिचं तोंड काळं -निळं करून टाकूया,” तिसरी म्हणाली.

“पण मी काही तुमची चेष्टा करायला इथे आलेली नाही,” एलिझाबेथ चटकन म्हणाल्या. “मी तुम्हाला मदत करायला आले आहे.”




“मला वाटतं आता आपण इथून निघावं,” फुलपाखरू म्हणाले.

“तुला जायचे असेल तर तू जा,” एलिझाबेथ म्हणाल्या. “मी मात्र थांबणार आहे.” रागावलेल्या स्त्रियांकडे पाहून त्यांनी हळूच हसण्याचा प्रयत्न केला.

“मला वाटतं, या बाई इतरांपेक्षा जरा वेगळ्याच वाटतात. त्यांचे कपडे काही फार चांगले दिसत नाहीत. आणि आपल्याला ओरबाडून काढता येतील अशी त्यांनी काही पिसे किंवा फुलंही घातली नाहीत,” आणखी एकजण म्हणाली.

“मग आता आपण हिचं काय बरं करूया?” एकीने विचारले.






“तुरुंगातल्या बायकांनी एलिझाबेथ फ्रायना गराडा घातला आहे,” एक पहारेकरी ओरडला. “मला वाटतं त्या त्यांना मारून टाकतील.”

आतापर्यंत एलिझाबेथना भीती वाटू लागली होती. कैदी महिलांनी त्यांना असे घेरले होते की पहारेकऱ्यांना फक्त त्यांची टोपी दिसत होती. ‘मी घाबरले आहे हे त्यांना कळून चालणार नाही,’ असा एलिझाबेथनी मनाशी विचार केला. ‘मी स्तब्ध उभी राहीन.’

“मी त्यांना मदत करायला इथे आले आहे यावर त्यांचा विश्वास बसायला हवा!” एलिझाबेथ मनाशी म्हणाल्या.

“कदाचित तसे होईलही!, तिकडे बघ, तिथे एक लहान मूल आजारी दिसते आहे,” फुलपाखरू कानात कुजबुजले.


एलिझाबेथने पाहिले. आणि मग त्यांनी जे केले ते पाहून सगळ्यांना आश्चर्य वाटले. अर्थात फुलपाखराला मात्र मुळीच आश्चर्य वाटले नाही.



एलिझाबेथ चिडलेल्या बायकांपासून दूर झाल्या आणि घाईने थंड जमिनीवर झोपलेल्या त्या लहान मुलाकडे गेल्या. त्याला त्यांनी उचलून घेतले.

“मैत्रिणींनो,” त्या कैदी महिलांना म्हणाल्या, “तुमच्यापैकी काही जणी आई असतील. मी देखील एक आईच आहे. तुमच्या मुलांकडे पाहून मला अस्वस्थ वाटतं. या निरागस लहानग्यांसाठी आपल्याला काहीच करता येणार नाही का? मोठे झाल्यावर त्यांनी देखील कैदी बनून तुरुंगातच राहावे असं तुम्हाला वाटतं का? त्यांनी चोर-दरोडेखोर बनावं असं तुम्हाला वाटतं का?”






अचानक त्या महिलांनी ओरडणे आणि धमकावणे थांबवले. आनंदाने त्यांच्या डोळ्यातून हळूच अश्रू वाहू लागले.

“या बाई चांगल्या दिसतात, त्या खरंच आपल्याला मदत करायला आल्या आहेत,” त्या म्हणू लागल्या.

“आतापर्यंत तुरूंगाबाहेरील कोणीच आमच्या मुलांकडे किंवा आमच्याकडे कधी लक्ष दिलं नाही,” त्यांच्यातील एकजण म्हणाली, आणि तिने एलिझाबेथ यांच्यासाठी एक खुर्ची आणली.






मग ज्यांना मुले होती त्या सर्व महिला आपल्या मुलांना घेऊन एलिझाबेथ यांच्याकडे आल्या.


"आपण या मुलांसाठी काहीतरी करायला हवे," एलिझाबेथ त्यांना म्हणाल्या.

"आपण या मुलांसाठी तुरुंगातच एक शाळा सुरु करता येते का पाहूया, त्याची मदत होईल."

ही मुले कधीच कोणा प्रौढ व्यक्तीला भेटली नव्हती आणि कोणी त्यांची चौकशीही कधी केली नव्हती. म्हणून त्यांना याची सवय नव्हती. पण त्यांना ते आवडले. मुले भीतभीतच एलिझाबेथ यांच्याकडे पाहून हळूच हसू लागली.

"ती खूष दिसताहेत," फुलपाखराच्या मनात विचार आला. "निदान काही मिनिटांपूर्वी दिसत होती त्यापेक्षा तरी आता जास्त आनंदी दिसतात."





एलिझाबेथ फ्राय यांनी खरोखरच न्यू गेट तुरुंगातील महिलांच्या मुलांसाठी एक शाळा सुरु केली. त्यांना लिहायला, वाचायला आणि शिवणकाम शिकवले.

बहुतेक मुलांच्या आयांना लिहिता वाचता येत नव्हते. त्या वर्गाच्या दारातून डोकावून पहायच्या आणि त्यांना वाटायचे, ‘आपल्याला पण असे शाळेत जाता आले तर किती बरे होईल!’




अखेर त्या सगळ्याजणी एलिझाबेथकडे आल्या. “आमच्यासाठी पण अशी शाळा सुरु कराल का?” त्या विनवणी करू लागल्या.


“मला खात्री देता येत नाही, कदाचित तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना ते आवडणार नाही. पण विचारायला काय हरकत आहे?” एलिझाबेथ म्हणाल्या.

एलिझाबेथ फ्रायनी तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना आपल्या घरी बोलावले आणि शाळेसंबंधी चर्चा केली.

त्या म्हणाल्या, “आपण तुरुंग जर अधिक चांगला बनवला, आणि या महिलांना उपयुक्त असे काही शिकवले, तर तुरुंगातून बाहेर पडल्यावर त्यांचे आयुष्य काहीसे सुधारू शकेल.”

“त्याचा काही उपयोग होणार नाही,” अधिकारी म्हणाले. “पण कैद्यांशी चांगले वागणे चुकीचे ठरते हे तुम्हाला पटावे म्हणून तुम्ही हवे तर प्रयत्न करून पहा.”





मग एलिझाबेथ फ्रायनी न्यू गेट मधील कैदी महिलांसाठी शाळा सुरु केली.

"तुम्हाला लिहिता-वाचता आले तर तुम्ही काही तरी करण्यात यशस्वी व्हाल आणि तुम्हाला परत तुरुंगात यावे लागणार नाही." एलिझाबेथनी त्यांना सांगितले.

"मला पण लिहिता - वाचता आले असते तर..." फुलपाखराच्या मनात विचार आला. पण त्याला ते कसे येणार? फुलपाखरे काही लिहू आणि वाचू शकत नाहीत!



फुलपाखरांना शिवणकाम आणि विणकाम देखील करता येत नाही! एलिझाबेथ फ्रायनी या महिलांना शिवणकाम आणि विणकाम शिकवले.

"तुम्ही जेव्हा असे काही करायला शिकाल, तेव्हा त्यातून तुम्हाला स्वतःपुरते पैसे मिळवता येतील. एकदा तुम्ही तुरुंगातून बाहेर पडलात की मग तुम्हाला भीक मागावी लागणार नाही किंवा चोरीही करावी लागणार नाही." एलिझाबेथनी त्यांना समजावले.

"फारच छान!" मग त्या बायका तुरुंगातील शाळेत आनंदाने रंगीत गोधड्या शिवायला शिकल्या.




"मी तुमच्या गोधड्या घेऊन जाईन आणि त्या विकून त्यातून मिळणारे पैसे तुम्हाला देईन आणि त्यातून तुम्हाला हवे ते तुम्ही विकत घ्या." एलिझाबेथनी त्यांना सांगितले.

"एलिझाबेथ फ्राय, तुम्ही किती चांगल्या आहात, धन्यवाद." कैदी महिला म्हणाल्या.



गोधड्या विकून मिळालेले पैसे हे बऱ्याच महिलांसाठी त्यांनी प्रामाणिकपणे केलेली पहिलीच कमाई होती. तुरुंगातील लहानशा दुकानातून त्यांनी त्या पैशातून साखर, चहा अशा गोष्टी विकत घेतल्या. आपल्या प्रयत्नाचा आता त्यांना अभिमान वाटू लागला.

"मला आज खूप आनंद झाला आहे. यापूर्वी मी कधीच इतकी आनंदी नव्हते." त्यांच्यातील एक जण म्हणाली.



मग एक दिवस तुरुंगातील परिस्थिती पाहण्यासाठी अधिकारी आले.

“हे काय?” ते आश्चर्याने म्हणाले. “इकडे येऊन पहा! सर्व किती स्वच्छ आहे. आणि या कैद्यांकडे तर पहा! त्या किती उत्साही, आनंदी आणि छान दिसताहेत!”



सगळ्या बायकांनी तुरुंग साफ केला होता. आणि त्या स्वतः देखील आता स्वच्छ रहात होत्या. तुरुंग आता एखाद्या गजबजलेल्या दुकानासारखा किंवा एखाद्या प्रेमळ घरासारखा दिसत होता. बायका मुळीच भांडत नव्हत्या. उलट त्या आता एकमेकींना मदत करत होत्या.

तुरुंगाचे अधिकारी हे सर्व पाहून इतके प्रभावित झाले की त्यांनी गावातल्या लोकांनाही तुरुंगात झालेला हा बदल मुद्दाम सांगितला.

ते म्हणाले, “पहा तर खरं! आता सर्व किती छान झाले आहे. एलिझाबेथ फ्राय तुरुंगात येऊन इथल्या स्त्रियांना मदत करायला लागल्यापासून या जागेत फार मोठी सुधारणा झाली आहे.”






त्यानंतर त्यांनी एक सभा बोलावली. "आपल्या तुरुंगात पुरुष कैदी देखील आहेत," एक अधिकारी म्हणाले. "तुम्ही जशी स्त्रियांना मदत केली आहे तशीच आपण त्यांनाही करू शकू."

"करायलाच हवी," एलिझाबेथ फ्राय म्हणाल्या. "त्यांच्याशी केवळ चांगले वागण्याने देखील फरक पडेल. आपण जेव्हा एखाद्याशी चांगले वागतो, तेव्हा ती व्यक्ती देखील आपल्याशी तशीच चांगली वागण्याची शक्यता असते. तुरुंगातील सर्वांनाच जर आपण चांगले, दयाळूपणे वागायला शिकवले तर ते सर्वजण चांगले होणार नाहीत का?"

अधिकारी म्हणाले, "आपण प्रयत्न तर करून पाहूया. अगोदर आपण आपल्या सर्व तुरुंगांमध्ये शाळा सुरु करूया."

त्यांनी शाळा सुरु केल्या आणि त्याचा परिणाम चांगलाच झाला. आपली देखील कोणाला तरी काळजी आहे असे जेव्हा कैद्यांच्या लक्षात आले आणि ते काहीतरी उपयुक्त कौशल्य शिकले, तेव्हा ते चुकीच्या मार्गाने जाण्याची शक्यता कमी झाली.



लवकरच एलिझाबेथ फ्रायना इंग्लंड मधील अनेक ठिकाणांहून पत्रे येऊ लागली. त्यांचा पत्रव्यवहार इतका वाढला की त्यासाठी त्यांना आपल्या मुलींची मदत घ्यावी लागली.

"आई, हे बघ एक खास पत्र आले आहे," त्यांची मुलगी म्हणाली. "त्यावर लाल रंगाचा शिक्का आहे." ते कुणाकडून आले असेल असे तुम्हाला वाटते?



ते पत्र उघडल्यावर एलिझाबेथना खूप आनंद झाला. इंग्लंड मधील कैद्यांना कसे वागवावे याविषयी त्यांनी इंग्लंडच्या संसद सदस्यांना माहिती द्यावी यासाठी संसदेत येण्याचे त्यांना आमंत्रण देण्यात आले होते. संसदेत भाषण देण्यासाठी, राणी सोडल्यास, कोणत्याच महिलेला यापूर्वी आमंत्रण देण्यात आले नव्हते.

फुलपाखरू म्हणाले, "मी तुझ्याबरोबर येऊ का?"

"अर्थात!" मग एलिझाबेथ आणि फुलपाखरू इंग्लंडच्या संसदेत गेले.



सन्माननीय संसद सदस्यांना एलिझाबेथने सांगितले, “उत्तर अगदी सोपे आहे. तुरुंग या लोकांना सुधारण्याच्या जागा बनायला हव्यात. जे लोक वाईट वागले आहेत त्यांनी येथे येऊन चांगले वागणे शिकावे. त्यांच्याशी वाईट वागून, मारहाण करून, त्यांना उपाशी ठेवून किंवा त्यांचा अपमान करून, त्यांना आपण कधीच चांगले वागायला शिकवू शकणार नाही.”

त्या पुढे म्हणाल्या, “त्यांच्याशी दयाळूपणे वागणे, त्यांना मदत करणे, ते आनंदी राहतील यासाठी प्रयत्न करणे हाच खरा मार्ग आहे. ते आनंदी असले की ते चांगले वागतील.”

“त्या म्हणतात ते बरोबर आहे,” संसद सदस्य म्हणाले.

फुलपाखरू हळूच तिच्या कानाशी येऊन म्हणाले, “एलिझाबेथ मला खरोखर तुझा अभिमान वाटतो.”



त्यानंतर एलिझाबेथ फ्राय यांना युरोपमधील अनेक देशांतील राजांना आणि महाराण्यांना तसेच पंतप्रधानांना भेटण्याची आमंत्रणे आली. आपल्या देशातील तुरुंगांमध्ये कशा सुधारणा कराव्यात हे त्यांना जाणून घ्यायचे होते.

त्या आलिशान घोडागाडीतून त्यांना भेटण्यासाठी जाऊ लागल्या.




युरोपमधील राजेरजवाड्यांना एलिझाबेथनी सांगितले की तुरुंगातील कैद्यांशी देखील चांगुलपणाने वागल्यास त्यांच्यात सुधारणा होण्याची शक्यता वाढते.



त्यांच्याशी याप्रकारे बोलल्यावर एलिझाबेथना मनापासून आनंद झाला. कोणाशीही चांगुलपणाने वागल्यास किती समाधान मिळते हे त्यांना चांगले माहित होते.



कदाचित, एलिझाबेथ फ्राय यांच्याप्रमाणेच कोणाशी चांगुलपणाने वागल्यास किती समाधान मिळते याचा तुम्हालाही अनुभव घेता येईल.



कदाचित तुमच्या आयुष्यात तुम्ही वेगळ्या प्रकारे आनंद आणायचे ठरवू शकाल. परंतु तुम्ही जे काही करायचे ठरवाल, त्यातून तुम्हाला अधिक आनंद मिळेल अशी आपण आशा करूया...



अगदी एलिझाबेथ फ्राय यांच्याप्रमाणेच!



एलिझाबेथ फ्राय यांच्याविषयीची ऐतिहासिक माहिती

एलिझाबेथ फ्राय

१७८०-१८४५

त्यांच्या काळातील कोणत्याही व्यक्तीपेक्षा एलिझाबेथ फ्राय यांनी तुरुंगात सुधारणा करण्यासाठी सर्वाधिक प्रयत्न केले. इंग्लंडमधून सुरू झालेल्या या सुधारणा युरोप खंडातील अनेक देशांत पोचल्या.

एलिझाबेथ गर्नी यांचा जन्म १७८० मध्ये झाला. त्यांच्या वडिलांची इंग्लंडमध्ये बँक होती. त्यांच्या व्यवसायात ते इतके यशस्वी होते की श्रीमंत व्यक्तीला 'गर्नी यांच्यासारखे श्रीमंत' असे म्हटले जात असे. हे कुटुंब क्वेकर पंथाचे होते, पण 'प्लेन क्वेकर' नावाने ओळखल्या जाणाऱ्या कट्टर पंथाचे नव्हते. वयाच्या १७ व्या वर्षी एलिझाबेथ यांनी 'प्लेन क्वेकर' हा पंथ स्वीकारला आणि त्या साधे कपडे घालू लागल्या व दागदागिने यासारख्या गोष्टींचा त्यांनी त्याग केला.

त्यांनी जोसेफ फ्राय यांच्याशी विवाह केला, ते देखील क्वेकर पंथीयच होते, आणि त्या एलिझाबेथ फ्राय झाल्या.

न्यू गेट च्या तुरुंगातील परिस्थितीची माहिती त्यांना प्रथम १८१३ मध्ये मिळाली. हा तुरुंग लंडनच्या अतिशय जुन्या आणि वाईट भागात होता. तिथे चार लहान खोल्यांमध्ये ४०० महिला रहात असत. ५० लहान मुले देखील आपल्या आयांबरोबर तुरुंगवास भोगत होती. त्यांचे कपडे म्हणजे चिंध्याच होत्या. तिथे पलंग, अंथरूण - पांघरूण, स्वच्छतागृहे, थंडीच्या दिवसात खोल्या उबदार ठेवण्याची, हवा खेळती राहण्याची, किंवा दिवाबत्तीची काहीच सोय नव्हती.

एलिझाबेथ फ्राय आणि त्यांच्या क्वेकर मित्रमंडळींनी प्रथम गरम कपडे आणि शिक्षण यापासून आपल्या तुरुंगातील कामाची सुरुवात केली. एलिझाबेथनी कैद्यांच्या जीवनात नवी आशा आणली आणि तुरुंगातील महिलांनी आपल्यामध्ये बदल घडवून आणण्याच्या गरजेबद्दल त्या बोलू लागल्या. त्या केवळ कैदी महिलांशीच बोलून थांबल्या नाहीत तर त्यांनी तुरुंगातील अधिकारी, आणि संसद सदस्यांशीही याबद्दल चर्चा करून कैद्यांविषयी सहृदयतेने विचार करण्याची विनंती केली.



कैद्यांना चांगली वागणूक मिळू लागल्यापासून कैद्यांच्या वर्तनात देखील नाट्यमय वाटावेत असे बदल झाले आणि एलिझाबेथ फ्राय
यांच्या विचारांचा इंग्लंडमध्ये सर्वत्र प्रसार होऊ लागला. त्याचप्रमाणे फ्रान्स, हॉलंड, डेन्मार्क आणि प्रशियातील राज्यकर्त्यांनी देखील त्यांचा सल्ला मागितला. रशियाच्या सम्राटांनी सेंट पिटर्सबर्ग येथील नव्या तुरुंगासाठी त्यांच्या सूचना विचारात घेतल्या. एलिझाबेथ यांच्या योजना इतक्या यशस्वी ठरल्या की ते म्हणाले, "त्या जगातील एक आश्चर्यच आहेत!"

एलिझाबेथ यांचे पती जोसेफ फ्राय यांना दरवेळी एलिझाबेथ यांचे काम पसंत होतेच असे नाही. परंतु त्यांच्या कामात ढवळाढवळ न करण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते आणि ते त्यांनी आयुष्यभर पाळले. त्यांच्या यजमानांच्या या पाठींब्यामुळे त्यांचे कौटुंबिक आयुष्य सुखाचे होते आणि त्या आपल्या कामावर लक्ष केंद्रित करु शकल्या आणि त्यात यशस्वीही झाल्या. त्यांना ११ मुले होती, त्यातील सर्वात लहान मुलाचा जन्म १८२२ साली झाला आणि त्याच दिवशी त्यांच्या २५ नातवंडांपैकी पहिल्या नातवंडाचाही जन्म झाला.

१८४५ मध्ये त्या मरण पावल्या. त्यापूर्वी त्यांनी अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणा घडवून आणल्या होत्या. महिला कैद्यांची तुरुंगातून मुक्तता झाल्यानंतर त्यांच्या कल्याणासाठी त्यांनी एक संस्था स्थापन केली. त्यावेळच्या कायद्यानुसार घरफोडी, दुकानातील उचलेगिरी किंवा लहान सहान चोरीसाठी स्त्रिया, पुरुष किंवा मुलांनाही फाशीची शिक्षा देण्याची तरतूद होती. हा कायदा बदलण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

फ्रान्सच्या राजाला दिलेल्या एका अहवालाच्या अखेरीस त्यांनी म्हटले होते: "तुम्ही जेव्हा एखादा तुरुंग बांधाल, त्यावेळी तुम्ही आणि तुमची मुले देखील यात कधीतरी राहू शकाल असा विचार करूनच त्याची उभारणी करा."